प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

बेस्ट

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर.

प्रसिध्दी पत्रक क्र.०३
दिनांक : २४.०७.२०२४

प्रति,
संपादक / वृत्तसंपादक

( सुमिल वैद्य )
जनता संपर्क अधिकारी करिता

.......................................................................................................

## सार्वजनिक गणेशोत्सव २०२४ – गणेशोत्सव मंडळांकरीता महत्वाच्या सूचना

सन २०२४ च्या गणेशोत्सवासाठी तात्पूरता विज पुरवठा घेण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकरीता महत्वाच्या सूचना तसेच अर्जदाराने पूर्ण करावयाच्या नियम व अटी

**मुंबई**, २४ – सालाबाद प्रमाणे प्रत्येक ग्राहक सेवा विभागात गणेशोत्सवासाठी तात्पूरता वीज पुरवठयाचे अर्ज स्विकारण्यासाठी सुविधा कक्ष सुरु केलेले आहेत. मागणी अर्जासोबत खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. ज्या गणेश मंडळांना मागणी अर्ज ऑनलाईन नोंद करायचे असल्यास त्यांनी बेस्ट उपक्रमाच्या www.bestundertaking.com या वेबसाईटवर जाऊन अर्ज नोंदणी करावी व केलेल्या अर्जाची प्रिंटआऊट संबंधित ग्राहक सेवा विभागात जमा करावी व खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. **मागणी अर्ज नोंदणी** - गणेशोत्सव मंडळांने आपला मागणी अर्ज लवकरात लवकर नोंदविणे आवश्यक आहे. सदर मागणी अर्जात मंडळाचे नाव, संपूर्ण पत्ता, पुरवठा हवा असलेला कालावधी तसेच मंडळाच्या जबाबदार प्रतिनिधिचे नाव व दुरध्वनी / मोबाईल क्रमांक लिहिणे, मंडळाच्या बँकेच्या खात्याची माहिती (बँकेचे नाव, खाते क्र. बँकेची शाखा इ.) अर्जामध्ये नमूद करावी तसेच अनामत रकमेचा परतावा एन. ई. एफ. टी. (NEFT) द्वारे मंडळाच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यासाठी विहित नमुन्यातील प्रपत्र भरणे. मागणी अर्जावर मंडळाचा रबरी शिक्का असणे आवश्यक आहे. मंडळाने मंडपाच्या सुरक्षिततेची जबाबदारी स्विकारुन हमीपत्र सादर करावे.

....२

**२. एन. ई. एफ. टी. (NEFT) प्रपत्र -** विजेच्या वास्तविक (Actual) वापरानुसार विद्युत देयकाच्या समायोजना नंतर अनामत रकमेवरील शिल्लक रकमेचा परतावा त्वरेने आपल्या मंडळाच्या बँकेतील खात्यामध्ये एन. ई. एफ. टी (National Electronic Fund Transfer) द्वारे एक महिन्याच्या आत जमा करण्यात येणार आहे. तत्संबंधी, विहित नमुन्यातील प्रपत्र सादर करणे (सदर विहीत नमुन्यातील प्रपत्र संबंधित ग्राहक सेवा विभागाच्या सर्व कार्यालयामध्ये उबलब्ध आहेत) सदर प्रपत्र न भरल्यास अनामत रकमेचा परतावा धनादेशाद्वारे ९० दिवसांत करण्यात येईल.

**३. जागा मालकाची/ गृहनिर्माण संस्थेची परवानगी -** ज्या ठिकाणी "श्रीं" च्या मंडपाची व्यवस्था आहे त्या जागेच्या मालकाची /गृहनिर्माण संस्थेची परवानगी आवश्यक आहे.

**४. विद्युत निरीक्षकाकडे सादर केलेला अर्ज -** विद्युत निरीक्षकाने दिलेली परवानगी अथवा त्या खात्याकडे केलेल्या अर्जाची प्रत.

**५. चाचणी प्रतिवृत्त/अहवाल -** अर्जदाराला आवश्यक असलेल्या विजभाराचे परवानाधारक विद्युत ठेकेदारांमार्फत मुल्यमापन करुन अर्जात त्याप्रमाणे योग्य ती नोंद करणे. अर्जदाराने अर्जात नमूद केलेल्या विद्युतभाराचे मान्यता प्राप्त विद्युत ठेकेदाराने दिलेले चाचणी प्रतिवृत्त सादर करणे, चाचणी प्रतिवृत्तामध्ये एकूण वापरात येणाऱ्या सर्व विद्युत उपकरणांचा भार लिहण्यात यावा जेणेकरुण अनधिकृत वीज पुरवठा वापरावर निर्बंध येतील. ELCB चाचणी प्रतिवृत्त देणे आवश्यक आहे.विद्युत अपघात टाळण्यासाठी गणेशोत्सव मंडळांनी श्रींच्या मंडपात योग्य क्षमतेचे वायरींग मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून भारतीय विद्युत नियमांनुसार करून घेणे, तसेच जमिनीवरुन विद्युत तारा टाकू नयेत. मार्गप्रकाश स्तंभाना वायरी गुंडाळू नयेत. वायरचे जोड सुरक्षित करुन घेणे.

**६. बृ.मुं.म. पालिकेकडून मंडप उभारणीबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र -** मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक २४ जून २०१५ च्या आदेशान्वये रस्ता / फुटपाथवर मंडपाची उभारणी करणाऱ्या गणेश मंडळांनी बृ. मुं. म. पालिकेकडून मंडप उभारणीबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्रही अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**७. पोलिस ठाण्याला सादर केलेला अर्ज -** संबधित पोलिस ठाण्याच्या परवानगीची या वर्षीची अथवा गतवर्षाची प्रत अर्जासोबत जोडणे. सदर कागदपत्र उपलब्ध नसल्यास या वर्षाच्या संबंधित पोलिस ठाण्यात अर्ज केल्याची पोचपावतीची छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे.

८. **विद्युत देयक प्रदान हमी पत्र** - ज्या केबिनमध्ये तात्पूरता मीटर हवा असेल, त्याच केबीनमधील कुठल्याही एका विजमापकाचे चालू विद्युत देयक अर्जासोबत जोडणे. गणेशोत्सव मंडळांने अथवा कायमस्वरुपी विद्युत देयक असणाऱ्या व्यक्तींने स्वस्वाक्षरी असलेले विद्युत देयक प्रदान हमीपत्र सादर करावे. गणेशोत्सव मंडळांने मागील वर्षाची विद्युत बिलाची (देयकाची) थकबाकी व अन्य विद्युत देयकाची थकबाकी असल्यास भरणे आवश्यक आहे.

**९. गणेशोत्सव मंडळांने खाली नमूद केल्याप्रमाणे विहीत शुल्कांचे प्रदान करावे.**

| | | |
|---|---|---|
| १) | मागणी अर्ज नोंदणी शुल्क | सिंगल फेज रु. ५०/-<br>थ्री फेज रु.७५/- |
| २) | जोडणी शुल्क | सिंगल फेज रु. १५०/-<br>थ्री फेज रु. २००/- |
| ३) | अनामत रक्कम | अ) वर्ष २०२३ च्या गणेशोत्सव वीजदेयक रकमे एवढे किंवा<br>ब) रु.२०/- प्रति दिवस प्रति किलो वॅट (फक्त नवीन मंडळांकरीता) जे जास्त असेल ते. |
| ४) | मीटर अनामत रक्कम | रु. १०००/- सिंगल फेज मीटर<br>रु. ३०००/- थ्री फेज मीटर (६० किलो वॅट पर्यंत)<br>रु. ४०००/- सि.टी. मीटर (६० किलो वॅट पेक्षा जास्त) |

१०. विजेचा दर हा १ एप्रिल २०२३ रोजीच्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मान्यता दिलेल्या आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीच्या दर पत्रकाप्रमाणे आहे. तात्पूरत्या वीज जोडणीसाठी स्थिर आकार हा मूळ **स्थिर आकाराच्या १.५ पटीत** आकारण्यात येईल. तसेच इंधन समायोजन आकार , विद्युत शुल्क, महाराष्ट्र कर (एम टॅक्स) व इतर कर आकारले जातील.

| (खालील दर दिनांक १ एप्रिल २०२४ पासून ३१ मार्च २०२५ पर्यंत) | | | |
|---|---|---|---|
| युनिटस्तर | स्थिर आकाराच्या (१.५ पटीत) | ऊर्जा आकार (रु.युनिटस) | व्हीलिग आकार (रु.युनिटस) |
| ०-१०० युनिटस | रु.९०/प्रति माह | १.८७ | १.९७ |
| १०१-३०० युनिटस | रु.१३५/ प्रति माह | ५.४६ | १.९७ |
| ३०१-५०० युनिटस | रु.१३५/ प्रति माह | ९.५६ | १.९७ |
| >५०० युनिटस | रु.१६०/ प्रति माह | ११.७३ | १.९७ |

११. अधिक माहितीसाठी आणि चौकशीसाठी गणेशोत्सव मंडळांनी संबंधित ग्राहक सेवा विभागातील खालील अधिका-यांशी संपर्क साधावा.

| ग्राहक सेवा विभाग | अधिका-याचे नांव | मोबाईल क्र. |
|---|---|---|
| ग्राहक सेवा 'ए' | श्री.संजय घेवडे, उप अभियंता | ९९६७४३९५३१ |
| ग्राहक सेवा 'बी' | श्रीमती इंदू दहात,उप अभियंता | ९९६९११३०२६ |
| ग्राहक सेवा 'सी' | श्री.मिलिंद वायदंडे, उप अभियंता | ७७३८६९८५०७ |
| ग्राहक सेवा 'डी' | श्री.अशोक थोरात, उप अभियंता | ९८९२२८७३४४ |
| ग्राहक सेवा 'इ' | श्री.भाईदास शिंदे, दुय्यम अभियंता | ८०८०२५८१८२ |
| ग्राहक सेवा 'एफ/साऊथ' | श्री.बंडेराव सावंत,दुय्यम अभियंता | ९५९४९३४५७० |
| ग्राहक सेवा 'एफ/नार्थ' | श्री.माणिक वाघमारे, सहा. अभियंता | ९८६९४००६१८ |
| ग्राहक सेवा 'जी/साऊथ' | श्री.नितिन थळे, सहा. अभियंता | ९८२१४०३६०३ |
| ग्राहक सेवा 'जी/नार्थ' | श्री.कुसुमाग्रज लोके, सहा. अभियंता | ८४५१८१८११७ |

***************